follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

| पश्चिम महाराष्ट्र |

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 • वर्ष २६ • अंक ३३६ • सातारा • गुरूवार दि.५ सप्टेंबर २०२४ • पाने ४ • किंमत ५/-

# 'लाडकी बहीण' मुख्यमंत्र्यांची की दादांची ?




## अजित पवार गटाच्या जाहिरातीतून मुख्यमंत्री गायब

**मुंबई:** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असली तरीही त्याला मिळणारा प्रतिसाद पाहून त्याचे श्रेय लाटण्यासाठी अजित पवार गट आणि शिंदे गट यांच्यात चढाओढ सुरू असल्याचे चित्र आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या एका जाहिरातीत लाडकी बहीण योजनेच्या नावातून 'मुख्यमंत्री' हा शब्द गायब करण्यात आला आहे तर या जाहिरातीला 'दादाचा वादा' ही टॅगलाईन वापरण्यात आली आहे. या जाहिरातीत अजित पवार वगळता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अथवा महायुतीच्या इतर कोणत्याही नेत्याचे छायाचित्रही नाही. या जाहिरातीत लाडकी बहीण योजनेत येणाऱ्या अडचणीच्या निवारणासाठी महिलांना संपर्क साधता यावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा हेल्पलाइन क्रमांक देण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आयोजित केलेल्या जनसन्मान यात्रेत अजित पवार लाडकी बहीण योजनेचा मोठ्या प्रमाणावर प्रचार प्रसार करीत आहेत. यात्रेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या गुलाबी रंगाच्या गाड्या आणि दादांचे गुलाबी जाकीट याद्वारे केले जाणारे पिंक पॉलिटिक्स सध्या चर्चेत आहे. या योजनेच्या माध्यमातून महिला मतदारांना अधिकारी प्रमाणात आकर्षित करण्याचे अजित पवार गटाचे प्रयत्न आहेत.

### महायुतीत निर्माण होऊ शकतात गैरसमज

**अजित पवार गटातील कार्यकर्त्यांच्या अशा कृत्यांमुळे महायुतीत गैरसमज निर्माण होऊ शकतात, असा इशारा शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी दिला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही शासकीय योजना आहे. या योजनेचे श्रेय जसे अजित दादांना आहे तसेच ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही आहे. अजित पवार गटाच्या नेत्या, कार्यकर्त्यांनी आपापल्या मतदारसंघात या योजनेचा प्रचार, प्रसार करताना अजित दादांचे मोठे छायाचित्र लावावे. त्यांचे आपल्या नेत्यावरचे प्रेम समजू शकते. मात्र, महायुतीत गैरसमज निर्माण होतील, अशी कृत्य करू नये, असे आवाहनही शिरसाट यांनी केले.**

### अजित पवार गटाने फेटाळले आरोप

**लाडकी बहिणी योजनेचे नावच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आहे. सरकार दप्तरी तशी नोंद आहे. ही योजना उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना जाहीर केली. ते तिला उपमुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, असे नाव देखील देऊ शकले असते. मात्र, तसे करण्यात आलेले नाही. योजनेच्या अर्जावरही ठळकपणे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे या योजनेबाबत जनतेच्या मनात, पर्यायाने महायुतीतील घटक पक्षांमध्ये कोणतेही गैरसमज होण्याचे कारण नाही, अशा शब्दात अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी शिंदे गटाकडून करण्यात आलेले आरोप फेटाळून लावले आहेत.**

# नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्गाची अधिसूचना रद्द करणार

## शेतकऱ्यांची नाराजी टाळण्यासाठी राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई :** विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना शेतकऱ्यांची नाराजी ओढवून घेतली जाऊ नये यासाठी राज्य सरकारने शक्तीपीठ महामार्गासाठी जमीन अधिग्रहित करण्यासाठी काढलेली अधिसूचना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळें सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेला ब्रेक लागणार आहे.

नागपूर ते गोवा हा ८०९ किमी लांबीचा शक्तीपीठ महामार्ग उभारण्याची सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या प्रस्तावित महामार्गाच्या उभारणींनंतर नागपूर ते गोवा अठरा तासाचा प्रवास निम्म्याहून कमी वेळेत पूर्ण होईल असा दावा केला जात आहे. वर्धा जिल्ह्यापासून सिंधुदुर्ग पर्यंत जाणारा हा महामार्ग राज्याच्या १३ जिल्ह्यांमधून जाणार आहे. या महामार्गासाठी तब्बल २७ हजार हेक्टर जमीन अधिग्रहित केली जाणार आहे.

पुढील वर्षी महामार्गाच्या कामाचा शुभारंभ करून सन २०३० पर्यंत हा महामार्ग वाहतुकीसाठी खुला करून देण्याचा सरकारचा मानस होता. मात्र, जमीन अधिग्रहणाला शेतकऱ्यांनी केलेल्या विरोधामुळे अधिग्रहणाची अधिसूचना रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्यातील तीन शक्तीपीठे या महामार्गावर असल्याने या महामार्गाला शक्तिपीठ महामार्ग असे नाव देण्यात आले आहे. याशिवाय दोन ज्योतिर्लिंग देखील या महामार्गाने जोडली जाणार आहेत. त्याचप्रमाणे पंढरपूर, पट्टणकोडोली, आदमापूर, सोलापूरचे सिद्धेश्वर देवस्थान अशी देवस्थाने ही या महामार्गाने जोडली जाणार आहेत.

मात्र, घोषणेपासूनच शक्तीपीठ महामार्ग वादाचे केंद्र ठरला आहे. या महामार्गासाठी अधिग्रहित केल्या जाणाऱ्या जमिनींपैकी मोठ्या प्रमाणावर जमिनी बागायती असल्यामुळे शेतकऱ्यांचा या अधिग्रहणाला ठाम विरोध आहे. अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी रस्त्यावर उतरून जमीन अधिग्रहणाला आपला विरोध तीव्रपणे व्यक्त केला आहे. सत्ताधारी पक्षातील स्थानिक नेत्यांनी देखील स्थानिक राजकारण लक्षात घेऊन या प्रकल्पाला विरोधच केला आहे.

त्यातच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची नाराजी उडवणे सरकारला परवडणारे नाही. अनेक नकारात्मक मुद्द्यांनी महायुतीला लोकसभा निवडणुकीत मोठा फटका सहन करावा लागला. त्यात शक्तिपीठ महामार्गाच्या अधिग्रहणाची भर पाडण्याची सरकारची तयारी नाही. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला अनुसरून शक्तीपीठ महामार्गासाठीचे जमीन अधिग्रहण रद्द केले जाणार आहे.

# दिशा सालीयान प्रकरणी आदित्यला सांभाळून घ्या

## ठाकरे यांनी विनंती केल्याचा राणे यांचा दावा

**मुंबई :** दिशा सालीयान मृत्यू प्रकरणी आदित्यला सांभाळून घ्या, अशी विनंती करणारा दूरध्वनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून आपल्याला आल्याचा दावा भाजप नेते नारायण राणे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला.

दिशा सालीयान मृत्यू प्करणी युवासेना नेते आदित्य ठाकरे यांच्यावर वारंवार आरोप केले जात आहेत. विशेषतः नारायण राणे आणि त्यांचे चिरंजीव आमदार नितेश राणे यांनी याप्रकरणी आदित्य यांना लक्ष्य केले आहे. नितेश राणे यांनी तर याप्रकरणी आदित्य यांच्या सहभागाचे कथित पुरावे बंद लिफाफ्यात सभागृहात सादर केले आहेत.

या प्रकरणात आदित्यला सांभाळून घेण्याची विनंती करण्यासाठी ठाकरे यांच्याकडून आपल्याला दूरध्वनी आला. आदित्यला सांभाळून घ्या. तुम्हालाही दोन मुले आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाल्याचे राणे यांनी सांगितले. त्यावर, तुम्ही तुमच्या मुलाला संध्याकाळी सात नंतर घराबाहेर जाऊ देऊ नका, असा सल्ला दिल्याचेही राणे म्हणाले.

मालवणमध्ये शिवछत्रपतींचा पुतळा ढासळल्यानंतर महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आलेल्या 'जोडे मारो' आंदोलनावरही राणे यांनी टीका केली. जोडे मारण्याशिवाय यांना दुसरे येते तरी काय, असा सवाल करून राणे म्हणाले की, आता जोडे मारण्याचे आंदोलन करणाऱ्यांपैकी किती जण पुतळा उभारल्यानंतर त्याच्यासमोर नतमस्तक होण्यासाठी मालवणात आले ते दाखवून द्यावे.

या प्रकरणातील शिल्पकार जयदीप आपटे याला सत्ताधाऱ्यांनी लपवून ठेवल्याच्या आरोपाचा राणे यांनी इन्कार केला. जयदीप आपटे किती दिवस फरार राहणार? कधी ना कधी त्याला अटक होईलच. त्याने वस्तुस्थिती सांगितल्याशिवाय पुतळा ढासळण्याच्या कारणांचा उलगडा होणार नाही, असेही राणे म्हणाले. कोणी काही म्हणाले तरी राजकोटावर शिवछत्रपतींचा पुतळा पुन्हा दिमाखात उभारला जाणार. पुतळ्याची निर्मिती दर्जेदार असणार. त्यामुळे सध्या पुतळ्याचा विषय बाजूला ठेवा आणि लोकांच्या कामाविषयी बोला, असे आवाहनही त्यांनी केले.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यावरही राणे यांनी टीका केली. शरद पवार यांची पावले दोन दिवस उलटले की पुढे मागे होतात. ते आज जे बोलले तेच उद्या बोलतील असे नाही. निवडणूक काळात ते काहीही बोलू शकतात, असेही राणे म्हणाले.

आपण काही वर्षांपूर्वी रेल्वेमंत्र्यांना वैभववाडी ते कोल्हापूर दरम्यान रेल्वे मार्ग विकसित झाल्यास त्यामुळे कोकणच्या विकासाला चालना मिळेल, याची माहिती दिली होती. कोकण मध्ये तयार होणारा कृषी माल घाटावर घेऊन जाण्यास त्यामुळे मदत होईल, असे आपण त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यावेळी त्यांनी या मार्गावर रेल्वे सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे, असेही राणे म्हणाले

# गिरीश महाजन यांना अडकविण्यासाठी आणला पोलिसांवर दबाव'

**जळगाव :** मंत्री गिरीश महाजन यांना अडकविण्यासाठी पोलिसांवर दबाव आणल्याप्रकरणी तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर केंद्रीय अन्वेषण विभागाने गुन्हा दाखल केला आहे. विधानसभा निवडणूक तोंडावर असताना या प्रकरणामुळे महा विकास आघाडीला धक्का बसला आहे.

पुण्यात एका कथित अपहरण प्रकरणानंतर गिरीश महाजन यांच्यावर मोक्काचा गुन्हा दाखल करून घेण्यात आला. या प्रकरणाचा तपास जळगावमध्ये वर्ग करून घेण्यासाठी देशमुख यांनी आपल्याला वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क साधला, असा जबाब जळगांवचे तत्कालीन पोलीस अधीक्षक प्रवीण मुंडे यांनी सीबीआयला दिला आहे. त्या आधारे देशमुख यांना या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. महाविकास आघाडी सत्तेवर असताना महाजन यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न वारंवार करण्यात आल्याचा आरोप तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी भर अधिवेशनात केला होता. त्याची पुष्टी करण्यासाठी त्यांनी प्रदीर्घ दृकश्राव्य मुद्रण असलेला पेनड्राईव्ह सभागृहात सादर केला. या पेनड्राईवमध्ये तत्कालीन विशेष सरकारी वकील प्रवीण चव्हाण यांच्या कार्यालयासह तीन ठिकाणच्या चित्रीकरणाचा समावेश आहे.

या प्रकरणी सीबीआयने चव्हाण यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याच प्रकरणात पोलिसांवर दबाव आणल्याच्या कारणाने देशमुख यांनाही आरोपी करण्यात आले आहे.

# अखेर एसटी कर्मचाऱ्यांचा संप मागे



## पगारात ६,५०० रूपयांची वाढ

**मुंबई :** आज एसटी कृती समिती आणि मुखमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये सह्याद्री अतिथीगृहावर बैठक पार पडली. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एसटी कर्मचाऱ्यांनी आपला संप मागे घेतला आहे. कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारामध्ये ६ हजारांची वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी अखेर संप मागे घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांची आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यांच्या काही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे शासनाने एसटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ६,५०० रुपयांची वाढ केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसेच मंत्री उदय सामंत आणि अन्य अधिकारी वर्ग उपस्थित होता. तसेच या बैठकीला कामगार संयुक्त कृती समितीचे शिष्टमंडळ उपस्थित होते. तसेच भाजप आमदार गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत, वकील गुणरत्न सदावर्ते तसेच एसटी कष्टकरी जनसंघाच्या जयश्री पाटील उपस्थित होत्या. आजच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संपावर तोडगा काढणार का याकडे सर्वांचे लक्ष होते. एसटी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मूळ वेतनात ५ हजार रुपयांची वाढ करण्याची मागणी केली होती.

मात्र राज्य सरकारने तब्बल ६,५०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

बैठकीनंतर भाजप आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले, मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसेच उद्योगमंत्री उदय सामंत यांचे मनापासून आभार मानतो. राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांनुसार राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळावे अशी आमची मागणी होती. सरकारने त्यासाठी एक समिती नेमली होती. त्या समितीने साडेपाच हजारांची वाढ करावी अशी मागणी केली होती. मात्र आता सरकारने आमची मागणी मान्य केली आहे. ज्या कर्मचाऱ्यांना २०२१ मध्ये अडीच, चार आणि पाच हजार वाढ मिळाली होती, त्या कर्मचाऱ्यांना सरसकट ६,५०० रुपयांची वाढ देण्यात आली आहे.

गेले दोन दिवस एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी संपाचे हत्यार उगारल्याने गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचे हाल होत होते. तसेच राज्यात इतर ठिकाणी देखील प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. मात्र अखेर बैठकीत तोडगा निघाला आणि प्रवाशानी सुटकेचा निश्वास सोडला.

# मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्यासाठी संख्याबळ नुसार निर्णय होणार : खा. शरद पवार

**कोल्हापूर :** मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्यासंदर्भात कोणत्या पक्षाचे किती उमेदवार निवडून येतील हे आधी पहावं लागेल आणि त्यानंतर संख्याबळ नुसार निर्णय होणार आहे. दरम्यान लोकांमध्ये महाविकास आघाडीचे वातावरण असून महाविकास आघाडीला बहुमत मिळेल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी व्यक्त केला. खा.शरद पवार हे कोल्हापूर दौऱ्यावर आलेत यावेळी ते माध्यमांशी बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटलीच नाही असं वक्तव्य करणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आरोपाचाही त्यांनी यावेळी समाचार घेतला. यावर बोलण्याचा अधिकार इतिहास संशोधक यांचा आहे. इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी याबाबत इतिहास सांगितला.चुकीचा इतिहास जनतेसमोर आणला तर त्याचा चुकीचा परिणाम होतो. असंही त्यांनी सांगितलं.

मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा केलेल्या जयदीप आपटेला जे काम दिलं होतं, त्यांनं इतकं मोठं काम कधी केलंल नाही. मुख्यमंत्री आणि सहकारी वाऱ्याचा वेग वाढल्याचं कारण सांगतात. मात्र जे कारण सांगितलं जातं ते योग्य नाही. अशी टिका खा. शरद पवार यांनी केली. मालवण किल्ल्याच्या इथं महाराज यांचा पुतळा कोसळला त्यावेळी शिवभक्तांची भावना असते ते राजकारण म्हणता येणार नाही. असंही त्यांनी स्पष्ट केले.

### गोवारीच्या संघर्षाला पुन्हा फुटले तोंडः चक्काजाम करण्याचा इशारा

**नागपूर :** गोंड गोवारी समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी ३० वर्षापासून सुरू असलेल्या संघर्षाने पुन्हा एकदा उग्ररूप धारण केले आहे. आपल्या मागण्यांची दखल न घेतल्यास उपराजधानी नागपूरचा चक्काजाम करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. याच मागणीसाठी काढण्यात आलेल्या ५० हजारांच्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या लाठीमारामुळे चेंगराचेंगरी होऊन तब्बल ११४ गोवारी आंदोलकांचा बळी गेला होता. महाराष्ट्रात गोवारी समाज आदिवासी प्रवर्गामध्ये समाविष्ट नाही. ती गोंड जातीची उपजातही मानली जात नाही. गोवारी स्वतःला गोंड गोवारी म्हणून घेत आदिवासी आरक्षणाचे फायदे लाटतात, असा निष्कर्ष काढून आदिवासी प्रवर्गातून गोवारीना आरक्षणापासून वंचित करणारा शासन आदेश जारी करण्यात आला. या आदेशाच्या विरोधात सन १९९४ च्या हिवाळी अधिवेशनात ५० हजार गोवारी आंदोलकांनी विधानभवनावर मोर्चा काढला. या मोर्चावर पोलिसांनी लाठीमार केल्यामुळे झालेल्या चेंगराचेंगरीत ११४ जणांचा मृत्यू झाला.

दरम्यान, गोंड गोवारी हे आदिवासीच असल्याचा स्पष्ट निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सन २०१८ मध्ये दिला. त्यामुळे गोंड गोवारी समाजाच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या. मात्र, गोवारी समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी सरकारकडून कोणत्याही हालचाली केल्या गेल्या नाहीत. त्यामुळे गोवारी समाजाचा संघर्ष पुन्हा नव्याने सुरू झाला.

# सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन अर्थात शिक्षक दिन

सर्वपल्ली राधाकृष्णन (तथा सर्वपल्ली राधाकृष्णय्या

५ सप्टेंबर १८८८ - १७ एप्रिल १९७५) हे एक भारतीय तत्त्वज्ञ आणि राजकारणी होते. त्यांनी १९६२ ते १९६७ पर्यंत भारताचे दुसरे राष्ट्रपती म्हणून आणि १९५२ ते १९६२ पर्यंत भारताचे पहिले उपराष्ट्रपती म्हणून काम केले. ते १९४९ ते १९५२ पर्यंत सोव्हिएत युनियनमधील भारताचे दुसरे राजदूत देखील होते. तसेच १९३९ ते १९४८ पर्यंत ते बनारस हिंदू विद्यापीठाचे चौथे कुलगुरू होते.

राधाकृष्णन हे विसाव्या शतकातील तुलनात्मक धर्म आणि तत्त्वज्ञानाचे सर्वात प्रतिष्ठित विद्वानांपैकी एक होते. ३ ुशल १ ते १९२१ ते १९३२ या काळात कलकत्ता विद्यापीठातील किंग जॉर्ज पंचम मानसिक आणि नैतिक विज्ञान या विभागाचे अध्यक्ष होते. तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठातील पूर्व धर्माचे स्पॅल्डिंग चेअर आणि नैतिकता विभागाचे १९३६ ते १९५२ पर्यंत ते अध्यक्ष होते. ४

राधाकृष्णन यांचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदांतावर आधारित होते. त्यांनी या परंपरेची समकालीन आकलनासाठी पुनर्व्याख्या केली. ुशल १ ज्याला ते अज्ञात पाश्चात्य टीका म्हणायचे, त्याच्यापासून त्यांनी हिंदू धर्माचा बचाव केला. समकालीन हिंदू ओळख निर्माण करण्यात राधाकृष्णन यांनी योगदान दिले. ५ भारत आणि पश्चिम जग अशा दोन्ही देशांमध्ये हिंदू धर्माची समज निर्माण करण्यात त्यांचा मोठा प्रभाव होता. भारत आणि पश्चिम जग यांच्यामध्ये पूल बांधणारी व्यक्ती म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला.

राधाकृष्णन यांना त्यांच्या आयुष्यात अनेक उच्च पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९३१ मध्ये नाइटहूड, १९५४ मध्ये भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेला भारतरत्न आणि १९६३ मध्ये ब्रिटिश रॉयल ऑर्डर ऑफ मेरिटचे मानद सदस्यत्व त्यांना बहाल केले गेले. हेल्पेज इंडिया या भारतातील वृद्ध वंचितांसाठी एक ना-नफा संस्था असलेल्या संस्थापकांपैकी ते एक होते. राधाकृष्णन यांचा असा विश्वास होता की शिक्षक हे देशातील सर्वोत्तम बुद्धिवंत असावेत. १९६२ पासून, त्यांचा जन्मदिवस भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. ुशल २

सुरुवातीचे जीवन

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी मद्रास प्रेसिडेन्सी मधील चित्तोर जिल्ह्यातील तिरुत्तनी या ठिकाणी झाला. मद्रास ख्रिचन कॉलेज मधून त्यांनी पदवीचे शिक्षण घेऊन त्याच कॉलेज मधून पदवीत्तर शिक्षण घेतले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुरुवातीस सहाय्यक प्राध्यापक आणि नंतर प्राध्यापक म्हणून अनुक्रमे मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेज आणि म्हैसूर विद्यापीठामध्ये १९१८ - १९२१ दरम्यान काम केले. म्हैसूर विद्यापीठाने राधाकृष्णन यांचा तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून गौरव केला.

१९२१ - १९३१ या दरम्यान कोलकत्ता विद्यापीठाने त्यांना तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नियुक्त ले.

राधाकृष्णन १९३१ - १९३६ मध्ये आंध्र विद्यापीठाचे कुलगुरू झाले. १९३९ मध्ये पंडित मदन मोहन मालवियांच्या विनंतीवरून त्यांनी बनारस विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून सूत्र हाती घेतले. ते १९४८ पर्यंत बनारस विद्यापीठाचे कुलगुरू राहिले.

कोलकत्ता विद्यापीठ आणि बनारस विद्यापीठ या दोन्ही विद्यापीठात काम पाहत असताना डॉ. राधाकृष्णन यांनी प्राध्यापक पदाचा त्याग केला नाही. कोलकत्ता विद्यापीठातील आठवडाभराचे अध्यापनाचे दिवस सांभाळून शनिवार आणि रविवार हे दोन दिवस ते बनारस विद्यापीठाचेही प्रशासकीय कारभार पाहत असत.

ऑक्सफर्ड विद्यापीठात दरवर्षातून काही महिने अशाप्रकारे २० वर्षे त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. राधाकृष्णन यांच्यासाठी ऑक्सफर्ड विद्यापीठात (१९३६ - १९५२) विद्यासन निर्माण केले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शैक्षणिक कारकिर्दी मध्ये यश मिळवल्यानंतर त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती होते. ते १३ मे १९५२ - १२ मे १९६२ पर्यंत उपराष्ट्रपती राहिले. भारताने १९५४ साली त्यांना 'भारतरत्न' हा किताब देऊन त्यांना गौरविले.

त्याचप्रमाणे ते स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती (१३ मे १९६२ - १३ मे १९६७) होते.

भारतरत्न, माजी राष्ट्रपती आणि शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते. शिक्षणाबद्दल डॉ. राधाकृष्णन यांना अतिशय जिव्हाळा होता. शिक्षण क्षेत्रात अधिकाधिक विकास घडून यावा यासाठी ते आयुष्यभर प्रयत्नशील होते. गुरु ब्रह्मा, गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात परब्रह्म तस्मैः श्री गुरुवेः नमः।ऋ भारतीय संस्कृतीत आईनंतर सर्वांत महत्त्वाचे स्थान आहे ते गुरुला. आई जशी मुलांवर संस्कार करते, तसा गुरु हा मुलांना घडवण्याचे, त्यांना सक्षम करण्याचे काम गुरु करतो. जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरुचा वाटा खूप मोठा असतो. त्यामुळे शिक्षक दिनाला भारतीय संस्कृतीत अधिक महत्त्व आहे.

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच, ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. शिक्षक दिनाच्या दिवशी विद्यार्थी आपल्या गुरुजनांबद्दल आदराची आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात. तसेच शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व आणि भविष्यातील पिढ्यांच्या जागरुकतेसाठी हा दिवस साजरा केला जातो. मूळात शिक्षक दिनाची सुरुवात कशी झाली? जागतिक स्तरावर शिक्षक दिन कधी साजरा केला जातो? जाणून घेऊया...

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. राजकारणात त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. भारताचे उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपती अशी दोन्ही पदे भूषविली असली, तरी शेवटपर्यंत आदर्श शिक्षकाची ओळख त्यांनी जपली. म्हणूनच त्यांच्या स्मरणार्थ ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. भारतामध्ये सर्वप्रथम सन १९६२ मध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. माझा जन्मदिवस शिक्षक दिनाच्या रुपात साजरा करणे माझ्यासाठी गौरवास्पद असेल, असे राधाकृष्णन यांनी सांगितल्याची आठवण सांगितली जाते.

युनेस्कोने ५ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय शिक्षक दिन म्हणून जाहीर केला आहे. रशियामध्ये १९६५ ते १९९४ पर्यंत ऑक्टोबर महिन्यातील पहिला रविवार शिक्षक दिन म्हणून साजरा केला जात होता. १९९४ सालापासून युनेस्कोच्या निर्णयानंतर त्यांनी ५ ऑक्टोबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून स्वीकारला. इंडोनेशिया, व्हिएतनाम देशात नोव्हेंबर महिन्यात, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, ब्राझील, कॅनडा, चीली, जर्मनी यासारख्या देशात ऑक्टोबरमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात येतो. साधरण २० व्या शतकापासून शिक्षक दिन साजरा करण्याची परंपरा जगभरात सुरू झाली. जागतिक स्तरावर वेगवेगळ्या दिवशी का होईना, पण हा दिवस साजरा करतात. चीनमध्ये १९३१ मध्ये 'नॅशनल सेन्ट्रल यूनिव्हर्सिटी'मध्ये शिक्षक दिनाची सुरुवात करण्यात आली. सन १९३९ मध्ये कन्फ्यूशिअसचा जन्मदिवस २७ ऑगस्ट हा दिवस शिक्षक दिन म्हणून घोषित करण्यात आला. मात्र, १९८५ मध्ये १० सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून त्याला मान्यता मिळाली.

चांगल्या शिक्षकांचा सन्मान हा संस्कृतीचा, सत्याचा व ज्ञानाचा सन्मान आहे. समाजाचा विकास सत्तेने होत नाही, यंत्राने होत नाही तर तो आदर्श शिक्षकांमुळे होत असतो. शिक्षकांचे महत्त्व असाधरण आहे हे जाणल्याशिवाय आपली तांत्रिक व यांत्रिक प्रगती होणार नाही.

ज्या देशामध्ये शिक्षकाला सर्वत्र मान व प्रतिष्ठा असते तेथील प्रज्ञावंत माणसे शिक्षण क्षेत्रातच अधिकाधिक आढळून येतात. असे देश सर्वांगीण प्रगती करू शकतात. समाजाला सुसंस्कृत करणारा शिक्षक हा देशाचा आधार आणि दिलासा आहे. त्यामुळे नागरिकांनी या पवित्र व्यवसायाचा सन्मान केला पाहिजे.

एक कुलगुरू हा गुरुकुलाचा आद्य आचार्य असावयास हवा. ज्ञानाने, तापाने, चारित्राने तो सगळ्यांच्या अग्रस्थानी असावा. हे वाक्य कुलगुरू, प्राध्यापक, आणि एक शिक्षक म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना पूर्णतः लागू होते. एक शिक्षक शिष्याला ज्ञान देताना परिपूर्ण असावा असे त्यांचे मत होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी अनेक विषयांचा अभ्यास केला होता.

संस्कृत भाषेचा अभ्यास करून त्यांनी प्रस्थानत्रयी आणि समग्र भाष्यग्रंथ अभ्यासले. पश्चिमेकडचे तत्त्वज्ञानातील प्लेटो, प्लॉटनिस, कान्ट, ब्रॅडले यांच्यासारख्या तत्त्वज्ञांच्या ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला. त्याचप्रमाणे इंग्रजी साहित्यातील शेक्सपिअर, कोलारीज, ब्राउनिंग, वल्ट विटमन इत्यादी साहित्यिकांच्या लेखन शैलीचा त्यांनी अभ्यास केला. तसेच गटे, डानटे, होमर यांसारख्या महाकवींची काव्यसृष्टी अनुभवली. त्यामुळे एक परिपूर्ण शिक्षक म्हणून संपूर्ण जगाने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा गौरव केला.

# अलार्ड ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचा २० वा स्थापना दिवस उत्साहात




**पुणे :** आयुष्यात कधीही हार मानू नका, व्यक्तीच आयुष्य चढ उतारांनी भरलेले असते. परिस्थिती नेहमीच सारखी नसते. कधी तो यशाच्या शिखरावर तर कधी त्याला अपयशाला समोर जावे लागते. त्यामुळे जीवनात आपला आत्मविश्वास आणि सकारात्मक विचार कायम ठेवला पाहिजे. जे सतत प्रयत्न करतात ते कधीही हरत नाहीत.असे मत अलार्ड चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक व अलार्ड विद्यापीठाचे कुलपती डॉ. एल.आर.यादव यांनी मांडले.

शहरातील मारूंजी येथील अलार्ड ग्रुप ऑफ इन्स्टिटयुशन्सचा २० वा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. एल.आर.यादव बोलत होते.

महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या कोल्हापूर टस्कर्स क्रिकेट संघाचे कर्णधार राहुल त्रिपाठी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच अलार्ड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पूनम कश्यप, अलार्ड चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. आर.एस.यादव, विद्यापीठातील विविध विभागाचे डीन डॉ. त्रिपाठी, डॉ. जैन, डॉ. सपाटे, डॉ. आशीष दीक्षित आणि डॉ. सोनिया उपस्थित होत्या. डॉ. एल.आर. यादव म्हणाले, परिश्रम करणे, निरोगी स्पर्धेत सहभागी होणे, सहकार्य करणे आणि संयम राखणे ही मूल्ये व गुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाले पाहिजेत. जीवनातील प्रतिकूल काळात शिक्षक आणि पालकांनी मुलांना समजावून सांगितले पाहिजे. त्यांना कठोर परिश्रम पुढे घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहित करावे लागते आणि त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी वेळेचे मूल्य समजून घ्यावे लागेल.

राहुल त्रिपाठी म्हणाले, विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार विकसित करावा. अपयशाच्या वाटेवर चालल्यानेच यश मिळते. वारंवार अपयशी झाल्यानंतर यशस्वी होण्यासाठी संयम, सहकार्य आणि स्वतःवर विश्वास ठेवून सतत काम करत राहिले पाहिजे.

डॉ. पूनम कश्यप म्हणाल्या, विद्यार्थ्यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम आणि समर्पण आवश्यक आहे. प्रत्येक आव्हान ही एक संधी आहे असे समजावे. जीवनात यश मिळविण्यासाठी धैर्य आणि चिकाटी महत्वाची आहे.

डॉ. अननिया अर्जुना यांनी आपल्या भाषणात ट्रस्टच्या अनोख्या प्रवासाचे कौतुक केले. यशस्वी होण्यासाठी टीमवर्क किती महत्वाचे आहे हे सांगितले.

स्थापना दिनाची शोभा वाढविण्यासाठी अलार्ड पब्लिक स्कूलचे विद्यार्थी आणि शिक्षकांनी महिला सक्षमीकरणावर आधारित एक अप्रतिम सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण ही केले.

# २४ दुचाकी चोरणा-या अट्टल वाहन चोरास हडपसर पोलीसांकडून अटक

**हडपसर :** सध्या पुणे शहरात दुचाकी वाहन चोरीच्या घटना घडत असल्याने पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पुणे शहरात चाहन चोरीचे गुन्ह्याचे प्रमाण वाढत असल्याने, त्याबाबत कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या. तसेच आर राजा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ यांनी देखील हडपसर पोलीस ठाणे येथे अधिकारी यांची बैठक घेवून वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणणेचाबत सुचना दिल्या.

वरीष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे संतोष पांढरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर, यांनी तपास पथक अधिकारी / अंमलदार यांची मिटींग घेवून वाहनचोरीचे गुन्हे उघड करण्यासाठी आराखडा तयार केला.त्यानुसार

हडपसर पोलीस स्टेशनचे तपासपथक अधिकारी अर्जुन कुदळे, सहा पोलीस निरीक्षक, महेश कवळे, पोलीस उप निरीक्षक, पोलीस अंमलदार दिपक कांबळे, चंद्रकांत रेजितयाड, अजित मदने, कुंडलीक केसकर असे पोलीस ठाणे हद्दीत वाहनचोरी प्रतिबंधक पेट्रोलींग करीत असताना, पोलीस अंमलदार दिपक कांबळे आणि चंद्रकांत रेजितयाड यांना मिळालेल्या गोपनीय बातमीवरून आरोपी दिपक उर्फ जोजो बाबूराव सरवदे वय ३० रा. थोरात वस्ती, द्वारका मेडीकल समोर कोलवडी रोड मांजरी पुणे यास ताब्यात घेवून त्याचे कडे केले विचारपूस तपास केले असता त्याने मांजरी, मुंढवा, लोणीकाळभोर, लोणीकंद, या भागातून वेळोवेळी दुचाकी चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याचेवर यापूर्वी पुणे शहरात मोटार सायकल चोरीचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

आरोपी नामे दिपक उर्फ जोजो सरवदे याचा मागिल काही महिन्यापासून हडपसर तपासपथक हे शोध घेत होते परंतु तो मिळून येत नव्हता. आरोपी चे ठावठिकाण्याबाबत खात्रीलायक माहीती प्राप्त करून त्यास ताब्यात घेतले, आरोपीस हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ९००/२०२४ भा.दं. वि. कलम ३७९ या गुन्ह्यात अटक करून त्यास न्यायालयात हजर करून त्याची दिनांक ०५/०९/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.

# भाजपा युती सरकारचे कायदा सुव्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष आणि पैसा वसुलीवर मात्र लक्ष : रमेश चेन्नीथला

**मुंबई :** राज्यातील कायदा व सुव्यवस्था अत्यंत खालावलेली असून हत्या, खून, दरोडो, बलात्कार यांचे प्रमाण वाढले आहे. पुण्यात नुकतेच दिवसाढवळ्या दोन खून झाले. राज्यात शांतता राखण्यात भाजपा युती सरकार अपयशी ठरली आहे. कायदा सुव्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जात असून सरकारचे सर्व लक्ष मात्र घोटाळे करून पैसा वसुल करण्याकडे आहे, असा घणाघाती हल्लाबोल प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केला.

विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी पश्चिम महाराष्ट्रातील पुणे शहर व ग्रामीण, सातारा, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पुण्यात झाली

या बैठकीला प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, उथउ सदस्य, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, गोवा दिव दमनचे प्रभारी माणिकराव ठाकरे, खासदार प्रणिती शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, माजी मंत्री रमेश बागवे, मोहन जोशी, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष वजाहत मिर्झा, पुणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. संजय जगताप, पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद शिंदे, पिंपरी चिंचवड काँग्रेसचे अध्यक्ष कैलाश कदम, आ. संग्राम थोपटे, आ. रविंद्र धंगेकर एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष आमिर शेख आदि उपस्थित होते.

यावेळी चेन्नीथला पत्रकारांशी बोलत होते, ते पुढे म्हणाले की, पुणे शहर आय. टी. राजधानी आहे पण शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली आहे, रस्त्यावरून वाहन चालवणे अत्यंत कठीण बनले आहे,याचा आय. टी. कंपन्यांना फटका बसत आहे. आतापर्यंत १२० मतदारसंघातील आढावा घेण्याचे काम पूर्ण झाले आहे. संघटन मजबूत करण्याचा हा कार्यक्रम असून जनतेमध्ये जाऊन काँग्रेसचा विचार पोहचवणे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या जनविरोधी धोरणांची माहिती पोहचवण्याचे काम केले जाणार आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने मविआला जसा पाठिंबा दिला तसाच विधानसभा निवडणुकीतही देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, पुण्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे, दिवसाढवळ्या गोळ्या घालून खून केले जात आहेत. सरकार व पोलीस प्रशासनाचा वचक राहिलेला नाही. पोलीस आयुक्त, डीसीपी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, शिपाई या सर्व पदांची पैसे घेऊन पोस्टिंग केली जात आहे. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचीच पोस्टींग चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेली आहे. सांस्कृतिक वारसा लाभलेल्या पुणे शहराला कलंक लावणाऱ्या घटना घडत आहेत. राज्यात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला पुर्व विदर्भात धान, कापसाचे पिक वाया गेले. आता मराठवाडा व विदर्भातील काही भागातील सर्व पिके नष्ट झाली आहेत.



# प्रा. श्रीकांत देशपांडे यांना उत्कृष्ट भाषण पुरस्कार जाहीर

**वाशिम :** शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार तथा शिक्षक नेते प्रा.श्रीकांत गोविंदराव देशपांडे यांना राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०१९-२० करिता महाराष्ट्र विधानपरिषद उत्कृष्ट भाषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याचे शिक्षक आघाडीचे विभागीय प्रसिध्दी प्रमुख तथा माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांचेवाशिम रिसोड तालुका आघाडी शिक्षण संघटना अध्यक्ष भागवत घुगे यांनी देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला.

# मोबाईल हॉटस्पॉट न दिल्याच्या कारणावरून एकाचा धारदार शस्त्राने खुन

**हडपसर :** हडपसरमध्ये गाडीतळ उत्कर्षनगर सासवड रोड फुटपाथवर मोबाईल हॉटस्पॉट न दिल्याच्या कारणामुळे एकाचा खून करण्यात आला.

मोबाईल हॉटस्पॉट वादावरून झालेल्या खुनाचे गुन्ह्यातील चौघां आरोपींना हडपसर तपास पथकाने १२ तासाचे आत अटक केली.

दिनांक ०२.०९.२०२४ रात्री ०२.१५ वा नियंत्रण कक्ष पुणे शहर येथून फोन कॉल प्राप्त झाला त्यामध्ये एक इसम सासवड रोडवर हडपसर गाडीतळ येथे फुटपाथवर इसम रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याची खबर मिळाली होती. तो मयत झाला आहे. प्राप्त झालेल्या कॉलच्या ठिकाणी आर. राजा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-०५, पुणे, संभाजी कदम पोलीस उपआयुक्त परिमंडळ-०३, पुणे, निखील पिंगळे पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा, पुणे, अश्विनी राख, मॅडम सहायक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, ऊंदे सहायक पोलीस आयुक्त, आस्थापना विभाग, पुणे, संतोष पांढरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पो.स्टे. पुणे, निलेश जगदाळे, पोलीस निरीक्षक, गुन्हे, हडपसर पो.स्टे ,निकम पोलीस निरिक्षक गुन्हे मुंढवा पोलीस अर्जुन कुदळे सहा. पोलीस निरिक्षक हडपसर पोलीस स्टेशन महेश कवळे पोलीस उप निरिक्षक हडपसर पोलीस ठाणे यांनी भेट दिली

उत्कर्षनगर सोसायटी समोरील फुटपाथवर, हडपसर पुणे येथे एक इसम रक्ताचे थारोळ्यात पडलेला दिसला तसेच त्याचे चेहऱ्यावर कोणीतरी अज्ञात इसमाने धारदार शस्त्राने निर्घणपणे वार करून चेहरा छिन्नविघ्छीन्न केल्याचे दिसले. खून झालेल्या इसमाचे नाव वासुदेव रामचंद्र कुलकर्णी वय ४७ वर्षे रा. बी/५, प्लॅट नं ०८, उत्कर्षनगर सोसायटी, सासवड रोड हडपसर पुणे असा असल्याची माहीती प्राप्त झाली. कुलकर्णी हे शनिवार पेठ पुणे येथे इंझी-१ फायनान्सीअल सर्विसेस गृहकर्ज करुन देण्याची एजन्सी चालवत असल्याची माहिती मिळाली ,मयत इसम याचा भाऊ याने फिर्याद दिल्याने हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं १३८७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०३ प्रमाणे अनोळखी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचे गांभिर्य ओळखून संतोष पांढरे, वरिष्ठ पोलीस पोलीस निरीक्षक हडपसर यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे व सुचनांप्रमाणे तपासपथक अधिकारी अर्जुन कुदळे, सहा पोलीस निरीक्षक, महेश कवळे, पोलीस उप निरीक्षक, तपासपथक अंमलदार जोतीबा पवार, समीर पांडुळे, भगवान हंबर्डे, अजित मदने, अतुल पंधरकर, चंद्रकांत रेजितवाड, अभिजीत राऊत, अमित साखरे, यांनी दाखल गुन्ह्यातील घटने.अगोदरचे ४ तासांचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले. त्याआधारे मिळालेल्या उपयुक्त माहीतीच्या आधारे आरोपी मयुर अतुल भोसले वय १९ वर्ष रा. सर्वे नं ०५, वेताळबाबा वसाहत, गणपती मंदिराजवळ गाडीतळ हडपसर पुणे. व इतर तीन विधीसंघर्षित बालक यांना ताब्यात घेतले.

ताब्यातील आरोपी यांचेकडे चौकशी केली असता तपासात आरोपी यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याने सांगितले की,मयत इसम हा फुटपाथवर पायी फिरत असताना त्याचेकडे मोबाईल हॉटस्पॉट मागीतले. मोबाईल हॉटस्पॉट न दिल्याने बाचाबाची व शिवीगाळ झाली. मयत कुलकर्णी याने आरोपी याच्या कानाखाली वाजवल्याने त्याचा राग आल्याने खुन केल्याचे मयुर भोसले यांनी सांगीतले. याचा पुढील तपास संतोष पांढरे, वरिष्ठ पोलीस पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर हे करीत आहेत. सदरची कामगिरी अमितेश कुमार, पोलीस आयुक्त सो पुणे शहर, रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त पुणे शहर, मनोज पाटील, अप्पर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, आर राजा, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ यांचे मागदर्शनाखाली अश्विनी राख मॅडम, सहाय्यक यांचे पथकाने करुन प्रशंसनीय कामगिरी केली.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# दहिवडीत महाविकास आघाडीचा निषेध मोर्चा

**दहिवडी** : महिलांसाठी आयोजित कार्यक्रमाचा फलक फाडल्याचा निषेध म्हणून महाविकास आघाडीकडून दहिवडीत निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी आमदार जयकुमार गोरे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. 'फलक फाडणाऱ्या आमदाराचं करायचं काय.....खाली मुंडं वर पाय'. अशा घोषणांनी दहिवडी दणाणले.




महाविकास आघाडीने येथील सिद्धनाथ मंदिरापासून तहसील कार्यालयापर्यंत हा निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्रभाकर देशमुख, राष्ट्रीय काँग्रेसचे नेते रणजितसिंह देशमुख, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, राशपचे प्रदेश युवक सरचिटणीस अभयसिंह जगताप यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रभाकर देशमुख म्हणाले, बोराटवाडीकरांची प्रवृत्ती उध्वस्त करण्याची आहे. म्हणून त्यांनी महिलांच्या कार्यक्रमाचा फलक उध्वस्त केला. त्यांना लोकशाही मान्य नाही. या प्रवृत्तीला मुसक्या घालण्याचं काम इथली जनता करणार आहे. खोट्या केसेस घालून महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज आम्ही रस्त्यावर उतरलोय हा आमचा तुम्हाला इशारा आहे. माण-खटावमध्ये परिवर्तन निश्चित होणार आहे.

अभयसिंह जगताप म्हणाले, फलक फाडण्याच्या कृतीतून लोकप्रतिनिधींकडून हुकूमशाहीचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही ही दादागिरी खपवून घेणार नाही. माणचा बिहार होवू देणार नाही. भ्रष्टाचारी सरकारचा आणि या हुकूमशाही प्रवृत्तीच्या लोकप्रतिनिधींचा माज उतरवून त्यांना धडा शिकवणार आहोत.

अनिल देसाई म्हणाले, फलक फाडण्याच्या प्रवृत्तीचा मी निषेध करतो. तुम्ही फलक्ञ0 फाडू शकता पण विचार फाडू शकत नाही. हा मोर्चा परिवर्तनाची सुरुवात आहे. विरोधकांच्या पापाची शंभरी भरली आहे. शंभर दिवसात परिवर्तन अटळ आहे.

# सनशाईन स्कूलच्या विद्यार्थी विराज देशमुख क्रिकेट स्पर्धात चमकला

## महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड, खटाव येथे उचित सत्कार

**खटाव** : गौरीशंकर ज्ञानपीठ संचलीत सनशाईन इंग्लीश मिडियम स्कूल (सी बी एस ई) खटावचा विद्यार्थी विराज मनोज देशमुख याची झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धासाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यानी बारामती येथे झालेल्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे संघाचा उपकर्णधार व मलिकावीर म्हणून या स्पर्धात त्याला गौरविण्यात आले.

यशाबदल नुकताच खटाव येथे गौरीशंकर नॉलेज सिटीचे संचालक डॉ अनिरुद्ध जगताप याच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी संस्थेचे प्रशासकिय अधिकारी नितीन मुडलगीकर जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर प्राचार्या प्रमिला टकले कार्यालय अधिक्षक वैभव जठार क्रिडाशिक्षक विशाल निकम मनोज देशमुख माधुरी देशमुख महेंद्र देशमुख अदि प्रमुख उपस्थित होते.

यावेळी डॉअनिरुद्ध जगताप म्हणाले विराज देशमुख या प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांचाक्रिडा क्षेत्रातील भविष्यकाळ उज्वल आहे. त्याची क्रिडाक्षेत्रातील प्रगती कौतुकास्पद आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो विराज देशमुख याची महाराष्ट्र टेनिस क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मदनराव जगताप, उपाध्यक्ष मिंलिद जगताप, संचालक जयवंतराव साळुंखे, आप्पा राजगे संस्थेचे कायदेशीर मॅनेजर रवि जगताप यांनी अभिनंदन केले.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी घेतली गंभीर दखल

## काँग्रेस नेते रणजितसिंह देशमुखांनी घातलं लक्ष

**वडूज** : राज्यातील सर्व एसटी कामगार त्यांच्या विविध मागण्यांसाठी संपात उतरले असून खटाव तालुक्यातील वडूज आगाराचे कर्मचारी यांनी ही संप सुरु केला आहे. शासकीय कर्मचाऱ्यां प्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांना वेतन, महागाई, घरभाडे आदी सुविधा मिळाव्यात. तसेच माजी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या मंत्री पदाच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांबरोबर करण्यात आलेल्या करारातील थकबाकी मिळावी आदी प्रमुख मागण्या साठी हा संप पुकारण्यात आला आहे.

दरम्यान राष्ट्रीय काँग्रेस कमिटी सदस्य रणजितसिंह देशमुखांनी वडूज येथे आंदोलनास बसलेल्या कर्मचाऱ्यांची भेट घेतली असता या कर्मचाऱ्यांनी संपाबाबत माहिती दिली. यावेळी रणजितसिंह देशमुखांनी स्वतः विरोधी पक्षनेते माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांच्याशी फोन वरून तातडीने संपर्क साधून या कर्मचाऱ्यांचं बोलणं करून दिलं. यावर वडेट्टीवार यांनी या मागण्यांबाबत स्वतः लक्ष घालण्याचा कर्मचाऱ्यांना विश्वास दिला. सर्व कर्मचाऱ्यांनी याबाबत समाधान व्यक्त केलं.

# डॉल्बीसाठी मॉडीफाय केलेल्या वाहनावर शाहूपुरी पोलिसांची कारवाई

**सातारा** : डॉल्बी साठी मॉडीफाय केलेल्या वाहनावर शाहुपुरी पोलिसांनी कडक कारवाई करत साऊंड सिस्टिम मालकावरही कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पोलीस अधीक्षक समीर शेख अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, साताऱ्चे उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांनी शाहुपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे यांना शाहुपुरी हद्दीमधील गणपती आगमन सोहळ्यामध्ये डॉल्बी आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या डॉल्बी मालकांवर कडक कारवाई करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने दि. १ सप्टेंबर रोजी शाहुपुरी पोलीस ठाणे हद्दीमध्ये गणपती आगमन मिरवणुकीत सह्याद्री गणेश तरुण मंडळ, कर्तव्य ग्रुप गणेश तरुण मंडळ, अजिंक्यतारा गणेश मंडळ या मंडळांच्या समोर वाजवण्यात आलेल्या डॉल्बी चालकावर न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच दि. २ रोजी भुई गल्ली तरुण मंडळ ढोणे कॉलनी सातारा यांची मिरवणूक राजवाडा ते देवी चौक अशी जात असताना भुई गल्ली तरुण मंडळ यांनी पाटील प्लस साऊंड सिस्टिम टेम्पो एमएच ११ एफ ३१४७ वर लावून सार्वजनिक रस्त्यावर डॉल्बी आदेशाचे उल्लंघन केले. त्यावेळी शाहुपुरी पोलीस ठाण्याचे बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी या सिस्टीमची ध्वनीमापक यंत्राद्वारे मोजणी करून साऊंड सिस्टीम मालकावर कारवाई केली आहे. तसेच या वाहन मालकाने वाहनांमध्ये बेकायदेशीर बदल केला असल्याने हे वाहन पुढील कारवाईसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात जमा करण्यात आलेले आहे.

# गणेशोत्सव काळात प्लाजमा, लेझरबिम लाईटला पूर्णतः बंदी

## डेसिबल मर्यादा ओलांडणाऱ्या डॉल्बींवर कारवाई, पोलीस अधीक्षक समीर शेख यांची माहिती

**सातारा** : येत्या सात सप्टेंबर रोजी गणरायाचे सातारा जिल्ह्यात आगमन होत आहे दिनांक ७ ते १७ सप्टेंबर या दहा दिवसांमध्ये संपूर्ण गणेशोत्सव काळात प्लाजमा लेझर लाईट यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे व ध्वनी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉल्बी यांच्यावर कठोर कारवाई करून त्या जागेवर जप्त करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दिले आहेत.

शेख यांच्या दालनामध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत संपूर्ण गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या सणाच्या काळात सर्वांनी शांततेने सण साजरा करून सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले .ते पुढे म्हणाले ८ सप्टेंबर गणपतीचा दुसरा दिवस, ११ सप्टेंबर गणपती उत्सवाचा पाचवा दिवस, १२ सप्टेंबर गौरी विसर्जन दिवस, १६ सप्टेंबर ईद ए मिलाद, १७ सप्टेंबर अनंत चतुर्दशी या काळामध्ये ध्वनीक्षेपकांना सकाळी सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत वापर करता येणार आहे.

ध्वनी क्षेपकांनी या काळामध्ये औद्योगिक क्षेत्रात ७० डेसिबल, वाणिज्य क्षेत्रात ५५ डेसिबल, निवासी क्षेत्रात २५ डेसिबल आणि शांतता क्षेत्रात ४० डेसिबल मर्यादितच ध्वनीक्षेपकांचा वापर करावयाचा आहे यापेक्षा अधिक क्षमतेच्या डॉल्बी या नाकाबंदी करून जाग्यावर जप्त केल्या जाणार आहेत याशिवाय लेझर बीम, प्लाजमा या मानवाला अपाय करणाऱ्या यंत्रणांना बंदी घालण्यात आली आहे.

सर्व गणेश मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे मंडप परिसरात बसवून त्याचे रिकॉर्डिंग किमान १५ दिवस जतन करावे, गणेशोत्सवांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना दर्शनासाठी स्वतंत्र रांग करण्यात यावी, गणेशोत्सव काळात टिंगल टवाळी करणाऱ्या सडकसख्याहरींवर



लक्ष ठेवण्यासाठी सातारा शहर पोलिसांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेची पाच पथके साध्या वेषात तैनात राहणार आहेत . गणेश मंडळांनी विद्युत व्यवस्था रोषणाई करताना चांगल्या दर्जाचे वायर्स जोडणी करावी सदरची जोडणी महावितरण विभागाकडून करावी, गणेश मूर्तीच्या संरक्षणाकरता मंडळाचे कमीत कमी पाच कार्यकर्ते व खाजगी सुरक्षा रक्षक २४ तास हजर राहतील.

गणेश मंडळांनी दर्शनासाठी येणाऱ्या महिला व पुरुषांचे स्वतंत्र रांग करावी व त्या ठिकाणी महिला स्वयंसेवक याशिवाय पोलिसांचे निर्भया पथक यावेळी तैनात राहणार आहे कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने सातारा जिल्ह्यातील सहाशे तडीपार गुन्हेगारांना तडीपार करण्यात येणार आहे डॉल्बी सिस्टीमवर नियंत्रण ठेवण्यासाठी सातारा जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला साऊंड अनालायझर देण्यात आला असून त्या माध्यमातून ध्वनी मर्यादेची तपासणी केली जाणार आहे. साताऱ्यात मोठ्या आवाजाचे डॉल्बी आढळल्यास त्याचा पंचनामा करून संबंधित डॉल्बी चालकांवर खटले दाखल करण्याचा इशारा पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दिला आहे.

# 'सुतारकी ते नायकवडी वस्ती रस्ता' खडीकरण व डांबरीकरणासाठी १५ लाख रू. निधी मंजूर

**वाई** : बावधन गावाने स्व.मदनराव पिसाळ यांच्या नंतर नेहमीच माझ्या विचारांची पाठराखण केली. त्यामुळे या भागाचा विकास करण्यासाठी मी कधीच कमी पडणार नाही अशी ग्वाही देऊन आ.मकरंद पाटील यांनी बावधन मधील 'सुतारकी ते नायकवडी वस्ती रस्ता' खडीकरण व डांबरीकरणासाठी १५ लाख रू.निधी मंजूर केला.



युवानेते प्रणित पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी आ.पाटील यांची भेट घेतली.नवनिर्वाचित खासदार नितीन काका पाटील यांचे ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सन्मान,सत्कार केल्यानंतर अनौपचारिक बोलताना या रस्त्याचा विषय निघाला. आ.पाटील यांनी या लोकांची समस्या ओळखून तातडीने १५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. प्रणीत पाटील यांनी ग्रामस्थांच्या भावना मांडल्या.उपस्थितांनी आ.पाटील यांच्या कार्यप्रणालीचे कौतुक केले.

यावेळी महात्मा फुले सोसायटीचे संचालक शामराव नायकवडी, माजी ग्रा.प.सदस्य दत्तात्रय नायकवडी,वसंत नायकवडी ,हनुमंत नायकवडी, सागर नायकवडी ,विठ्ठल नायकवडी ,प्रकाश नायकवडी, मंगेश नायकवडी,मनोज नायकवडी, हेमंत नायकवडी, ज्ञानेश्वर नायकवडी, संजय नायकवडी, निखिल नायकवडी, अमित कोल्हे,सागर कदम, महेंद्र कुदळे, अभिजित ननावरे,यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# डी. पी. भोसले महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

कोरेगाव : समाज व्यवस्थेच्या परिवर्तनात न्यायालयाचे योगदान महत्वपूर्ण आहे, बहुजन समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्यायालय व सुविधा विषयी जनजागृती होणे गरजेचे आहे. लोकशाही व्यवस्थेत आजही न्यायालयाचे अस्तित्व टिकून आहे. न्यायालयामुळेच लोकांचे स्वातंत्र्य आबाधित आहे असे प्रतिपादन निवृत्त न्यायाधीश बी. डी. खटावकर यांनी केले.



डी.पी. भोसले कॉलेजचा विद्यार्थी विकास कक्ष, समान संधी केंद्र आणि कोरेगाव तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कायदेविषयक जनजागृती शिबिरात निवृत्त न्यायाधीश बी.डी. खटावकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते.

कोरेगाव तालुका विधी सेवा समितीचे पॅनल प्रमुख ॲड. अभिजीत माने यांनी आपल्या प्रास्ताविकात गरिबांच्या पर्यंत कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व कायदा विषयक जनजागृती होणे आवश्यक असून ही आपल्या सर्वांची सामाजिक बांधिलकी आहे असे प्रतिपादन केले.

यावेळी ॲड. टी. जे. करळे यांनी पोक्सो कायदा याविषयी मार्गदर्शन केले तर ॲड. सौ. टी. एन. भोसले यांनी मादक पदार्थांचे सेवन आणि त्याचे परिणाम याविषयी विचार व्यक्त केले. ॲड.सौ. डी व्ही शिंदे यांनी रस्ते वाहतूक नियम मानवी जीवनात किती महत्त्वाचे असतात या संदर्भात मार्गदर्शन केले.

प्र. प्राचार्य. डॉ. बाळासाहेब चव्हाण म्हणाले की, सध्याच्या बदलत्या समाजात न्यायालयीन प्रक्रिया महत्त्वाची असून पक्षकारांच्या मनामध्ये न्यायाविषयी विश्वासाहर्ता निर्माण करण्यामध्ये विधी तज्ञांचे कर्तव्य व निष्ठा महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी आपल्याकडून कोणत्याही प्रकारची सामाजिक हानी होणार नाही असे वर्तन ठेवावे. मादक पदार्थांच्या सेवनापासून अलिप्त राहून अभ्यासातून आपले अपेक्षित ध्येय पूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे.

कायदेविषयक जनजागृती शिबिराच्या कार्यक्रमास समान संधी केंद्राचे समन्वयक डॉ. एन डी निकम, उपप्राचार्य प्रा. अश्विनी साळुंखे, उपप्राचार्य प्रो. डॉ. बी एस लोकडे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.

# साताऱ्यात आंदोलकांनी दिला दिव्यांग व भटक्या समाजाला न्याय

**कोरेगाव** : छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या साताऱ्यामध्ये अनेक आंदोलन होतात. काही आंदोलनाची शासन दरबारी दखल घेतली जात नाही. परंतु ,साताऱ्यात आज प्रथमच आंदोलकांनी दुसऱ्या आंदोलकांची बाजू ऐकून घेऊन त्यांना न्याय देण्याची भूमिका घेतलेली आहे. यामुळे खऱ्या अर्थाने साताऱ्यात प्रशासकीय दुर्लक्ष झाले तरी लोकशाही जिवंत ठेवणाऱ्या आंदोलकांनीच न्याय दिल्यामुळे दिव्यांग व भटक्या समाजाला समाजाच्या अशा पल्लवीत झालेले आहेत.

याबाबत माहितीकारांनी सांगितले की, आज मंगळवार दिनांक ३ सप्टेंबर रोजी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर कराड तालुक्यातील गोपाळ नगर येथील गोपाळ समाजातील लोकांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा. यासाठी मुख्य रस्त्यावर आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनांमध्ये या समाजातील बाळ गोपाळांनी घोषणाबाजी करून बंडखोर सेना प्रणित आदिवासी भटका समाज विकास अभियानाच्या वतीने बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले.

या आंदोलनामध्ये युवक प्रदेशाध्यक्ष क्रांतिवीर वायदंडे व भटक्या समाजातील अब्दुल शेख, विशाल जाधव, सौ. रेशमा शेख यांच्यासह सुमारे सव्वाशे गोपाळ समाजातील लोक पोट तिडकीने घोषणाबाजी करत होते .आपल्या मागण्या सरकार दरबारी मांडत होते.

या भटक्या समाजाकडे भारतीय नागरिक म्हणून कोणतेही कागदपत्रे पुरावे नाहीत. त्यांना शासकीय योजना चा लाभ मिळत नाही .त्यामुळे न्यायासाठी हा समाज घोषणाबाजी करत टाहो फोडत होता.

याची दखल घेऊन सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे आंदोलक श्री रमेश अनिल उबाळे व युवराज कांबळे, प्रहार संघटनेचे युवा नेते गौरव जाधव यांच्यासह मान्यवरांनी या भटक्या समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

कराड तालुक्यातील कार्वे येथील गोपाळ वस्ती मध्ये राहणाऱ्या या भटक्या समाजासाठी वरिष्ठ नेत्यांनी तातडीने कराडचे प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. तर दुसऱ्या बाजूला पालकमंत्र्यांच्या पाटण तालुक्यातील पापर्डे येथील दिव्यांग बांधव

दीपक निवृत्ती कांबळे यांना सुद्धा दिव्यांगांसाठी असणारी सायकल भेट देऊन आंदोलकांनी त्यांच्या चेहऱ्यावर हसू निर्माण केले.

या दोन्ही घटना खरोखरच आगळ्या वेगळ्या ठरल्या आहेत. सातारा शहरात लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांनी दुसऱ्या आंदोलकाला न्याय देण्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच घटना ठरली आहे. याची चर्चा संपूर्ण सातारा जिल्ह्यात सुरू झालेले आहे.

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुढे ढकलल्यामुळे प्रशासकीय कारभार सर्वत्र सुरू आहे .त्यामुळे लोकशाही धोक्यात आलेली आहे. असेच चित्र साताऱ्यात पाहण्यास मिळत आहे. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी प्रबळ विरोधी पक्ष असावा. याची आता सर्वांना उत्सुकता लागलेली आहे. लवकरात लवकर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्या तरच यापुढे आंदोलकांना न्याय मिळेल असे आता कार्यकर्त्यांनाही मनापासून वाटू लागलेले आहे. दरम्यान, यावेळी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख हनुमंतराव चवरे पाटील, पैलवान सागर साळुंखे, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे ऋषिकेश तथा रावण गायकवाड, नितीन माने संजय शिंदे अजित कांबळे यांच्यासह मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.





# छत्रपती शिवाजी विद्यामंदिरात पालक सभा व देणगीदारांचा सत्कार सोहळा उत्साहात

**शिरोळ :** शिरोळ येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यामंदिर क्रमांक ३ या शाळेमध्ये पालक मेळावा व देणगीदारांचा सत्कार असा संयुक्त कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिवाण उर्फ दिलीप कोळी हे होते

प्रारंभी स्वागत अध्यापिका जयश्री पेटकर यांनी केले तर प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका तेजस्विनी गायकवाड यांनी करून शाळेने राबवलेल्या विविध उपक्रमाची माहिती देऊन कार्याचा आढावा घेतला यावेळेस शाळेत सर्वांगीण मदत करणारे देणगीदार व विविध मान्यवरांचा यथोचित सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला पालक मेळाव्यामध्ये अध्यापिका शितल पाटील सविता जाधव सुरेखा येळगुडे जयश्री पेटकर आदींनी शाळेच्या समस्या व अडचणी मांडून शाळेने आज अखेर केलेल्या सुरक्षा व प्रगतीचा आढावा घेऊन पालकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले देणगीदारांचा सत्कार अध्यक्ष दिलीप कोळी सौ शशिकला पाटील सुरेखा येळगुडे जयश्री पेटकर यशवंत कांबळे कोमल कोळी मोदीता कोरोचीकर दिपाली बिरंजे यांच्या हस्ते करण्यात आला.

मान्यवरांच्या सत्कानानंतर प्रहार जनशक्ती पक्षाचे कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष डॉ दगडू माने पत्रकार सुरेश कांबळे बाळासाहेब कांबळे राजेंद्र प्रधान सामाजिक युवा कार्यकर्ते सुरज कांबळे दीपक शिंदे शालेय व्यवस्थापन अध्यक्ष दिलीप कोळी सौ हेमलाता जाधव यांनी सविस्तर मार्गदर्शन केले तर शाळेतील स्पर्धा विषय मार्गदर्शन जयश्री पेटकर यांनी केले मुलींच्या सुरक्षेविषयी शाळा पालक व समाजाचा सहभाग याविषयी सविस्तर माहिती सविता जाधव यांनी दिली अभ्यास शाळेतील स्वच्छता आरोग्य विषयी सुरेखा येळगुडे यांनी मार्गदर्शन केले आभार यशवंत कांबळे यांनी मांडले या कार्यक्रमास पालक माता मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कर्मवीर मल्टीस्टेट जयसिंगपूर संस्थेकडून सभासदांना १५ % लाभांश

**कोल्हापूर :** जयसिंगपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी या संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. भिर्डी सभागृह जयसिंगपूर येथे संपन्न झाली, सभेच्या प्रारंभी संचालक श्री राजेन्द्रकुमार नांदणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर संचालक श्री अनिल गडकरी यांनी विविध क्षेत्रातील दिवंगताना श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला तर सुभाष मगदूम यांनी क्रीडा क्षेत्रातील कामगिरीबद्दल स्वप्निल कुसाळे व विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्यांचा अभिनंदनचा ठराव मांडला. यानंतर संस्थेचे सीईओ श्री रविंद्र पाटील यांनी सभेच्या नोटीसीचे व मागील इतिवृत्ताचे वाचन केले. सभेचे अध्यक्ष चेअरमन श्री सागर चौगुले यांनी सन २०२३-२४ सालाचे हिशेबपत्रक व अहवाल सभेसमोर मांडला. आर्थिक धोरणात अनेक अमूलाग्र बदल होत असतानाही सर्व सभासद व ग्राहकांच्या पाठबळाने संस्थेने अहवाल सालात प्रत्यक्ष व्याज वसूलीतून ९ कोटी ३० लाख चोख नफा मिळविला आहे व त्या नफ्यातून सभासदांसाठी १५% इतका उच्चत्तम लाभांश वितरण करण्यात येणार असल्याची घोषणा केली. अहवाल सालात ठेवीमध्ये ४५ कोटीची वाढ होवून ५८८ कोटी तर कर्ज ३९१ कोटी राहिले आहे. संस्थेकडे ७८ कोटीचा मजबूत स्वनिधी असून भांडवल पर्याप्तताचे प्रमाण १५.४९% आहे. अहवाल सालात ८ नव्या शाखां सुरु करण्यात आली आहेत. संस्थेच्या कामगिरीची दखल घेवून महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन कडून पाचशे कोटी ठेवीवरील गटात *दीपस्तंभ पुरस्कार* तसेच फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी यांचे कडील *सर्वोत्कृष्ट संस्था* पुरस्कार असे दोन्ही पुरस्कार संस्थेस मिळाले आहेत.



वीराचार्य आधार योजना, रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील सुकन्या सन्मान योजना, कर्मवीर जेष्ठाधार योजना, अंत्यविधी योजना मधून सभासदांना २३ लाखाची मदत दिली आहे. *संस्थेचा केवळ नफा मिळवणे हा उद्देश नसून सामाजिक दृष्टिकोन ठेवणारे आम्ही मंडळी असल्यामुळे संस्थे मार्फत यावर्षी वीराचार्य बाबासाहेब कुचनुरे यांच्या नावे गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा साहित्य पुरवण्याची सुविधा सुरू केली आहे.*

मा पंतप्रधान यांनी सोलर ऊर्जा निर्मिती करिता अनुदान योजना जाहीर केले आहे. ज्या सभासदांना सोलर युनिट बसवून घेण्याचे आहे त्यांच्यासाठी अल्प दराने व वीज बिला इतक्या सुलभ हप्त्यात सौर ऊर्जा कर्ज संस्थेने उपलब्ध करून दिले आहे. आज अखेर १६७ सोलर पॅनल सभासदांनी बसवले आहेत येत्या दोन महिन्यात १००० सोलर पॅनल बसवण्याचे टार्गेट निश्चित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संस्थेकडे सोनेतारण, सुवर्ण खरेदी, वाहन खरेदी, घर खरेदी व बांधणी, शेती सुधारणा, औद्योगिक कर्ज अशा कारणांसाठी कमी व्याजदराने सुलभ कर्ज योजना आहेत याचा लाभ सभासदांनी घ्यावा असे अवाहन केले.

सभेच्या विषयपत्रिकेवरील विषयांचे विश्लेषण संस्थेचे संचालक सर्वश्री , भूपाल गिरमल, सुकुमार पाटील, भरत गाट, आदिनाथ किनिंगे, कुमार पाटील,अनिल भोकरे, रमेश पाटील, रावसो पाटील, भाऊसो पाटील, प्रा. आप्पा भगाटे, पंकज ऐवाळे यांनी मांडले व संचालक अरविंद मजलेकर यांनी कर्मवीर अण्णांच्या स्मारकाचा विशेष ठराव मांडला *गोरगरीब व बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अपार कष्ट घेतलेले थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मस्थळ कुंभोज या ठिकाणीची जागा संस्थेने खरेदी केली असून या ठिकाणी लवकरच अण्णांचे स्मारक निर्मिती संस्थेच्या पुढाकाराने करण्यात येणार आहे असे सांगितले यावेळी सर्व सभासदांनी त्यास टाळ्यांच्या गजरात अनुमोदन दिले.* (चौकट मध्ये)

सभासदांनी पाठविलेल्या व विचारलेल्या प्रश्नांना संस्थेचे चेअरमन श्री सागर चौगुले यांनी समर्पक उत्तरे दिली. याप्रसंगी मा. श्री भालचंद्र पाटील यांची दक्षिण भारत जैन सभेच्या अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल, मा. श्री संजय पाटील यड्रावकर यांना जयसिंगपूर भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल, माणगावचे सरपंच मा. श्री राजू मगदूम यांनी आपल्या कौशल्याने व विविध उपक्रमातून माणगाव गावचा आदर्श विकास केल्याबद्दल, प्रा.डी. ए.पाटील सर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त तर श्री.बाबासाहेब हुपरे यांना समाजरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल यथोचित सन्मान करण्यात आला.

सभेच्या अखेरीस संचालक श्री अमोल पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी संस्थेचे व्हा.चेअरमन सौ.उज्वला मगदूम, संचालिका सौ.उर्मिला उपाध्ये, माजी संचालक विजय आवटी, संस्थेचे सर्व शाखा सल्लागार, वीर सेवा दलाचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील, वीराचार्य पतसंस्थेचे चेअरमन एन.जे.पाटील, शांतीसागर पुण्यतिथीचे संयोजक अरुण पाटील आणि लेखापरिक्षक सीए प्रणील पाटील यांचेसह बहुसंख्येने सभासद उपस्थित होते.



# मातंग समाजाचे आयोग दो आंदोलन

मुंबई : अनुसूचित जाती आरक्षणामध्ये वर्गीकरण करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली न्यायालयीन आयोग स्थापन करावा व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी. यासाठी सकल मातंग समाज समन्वय समितीच्या वतीने आझाद मैदानात आयोग दो आंदोलन करण्यात आले.

पंजाब सरकार व सर्वोच्च न्यायालय यांच्या न्याय न्याय निवाड्याच्या आधारे महाराष्ट्रात मातंग समाजाला न्याय द्यावा. अशी मागणी मोहनराव कांबळे यांनी केली. आरक्षण वर्गिकर्णासाठी अभ्यास समिती स्थापन करा. आरक्षणासाठी कालबध्द कृती कार्यक्रम आखावा. असे बाळाजी घुमाडे यांनी सांगितले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था तत्काळ कार्यान्वित करावी. आणि आर्टी संस्थेला दहा हजार कोटी ची तरतूद करावी. अशी मागणी रणधीर कांबळे यांनी यावेळी केली.



# डोळ्यांचे उपचार आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात

मुंबई : डोळ्यांची शत्रक्रिया व उपचार करण्यासाठी भारतात अनेक सोई सुविधांचा अभाव आहे. जी खाजगी मोठी रुग्णालये आहेत त्यांची फी गरिबांना परवडत नाही. त्यामुळे आम्ही सर्वसामान्य रुग्णांसाठी नेत्रचिकित्सा क्षेत्रात आघाडीवर असलेल्या सेंटर फॉर साईट या आघाडीच्या रुग्णसेवा संस्थे सोबत विस्तार करत आहोत. त्यामुळे डोळ्यांचे उपचार आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतील असे लक्ष्मी आय हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. सुहास हळदीपूरकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

देशाच्या १५ राज्यांमधील ४० शहरांच्या ८२ केंद्रांवर ३५० पेक्षा जास्त तज्ञ डॉक्टर आणि २७०० कर्मचारी सेंटर फॉर साईट्स अंतर्गत कार्यरत आहेत. या माध्यमातून दरवर्षी दहा लाखांहून अधिक रुग्णांना सेवा पुरविली जात आहे. लक्ष्मी आय हॉस्पिटल यांच्या सोबत आता आंही विस्तार केला असून महाराष्ट्रात ९ केंद्र उपलब्ध केली आहेत असे सेंटर फॉर साईटचे अध्यक्ष आणि वैद्यकीय संचालक डॉ. महिपाल सिंग सचदेव यांनी सांगितले.

लक्ष्मी नेत्र रुग्णालय हे पनवेल, खारघर, डोंबिवली आणि कामोठे या चार ठिकाणी २.५ दशलक्षाहून अधिक रुग्णांना सेवा पुरवित आहे. डॉ सुहास हळदीपूरकर यांच्या नेतृत्वाखाली, ४० वर्षांपेक्षा जास्त अनुभवासह या संस्थेने रुग्णसेवेमध्ये नवी ओळख प्रस्थापित केली आहे. यावेळी डॉ. देवेंद्र वेंकटरामणी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# भोरला एसटी कर्मचारी संपामुळे विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिकांचे, महिलांचे हाल

**भोर :** ऐन गणपती उस्तवाची धामधूम सुरु असताना राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवार (दि.३) पासून राज्यव्यापी पुकारलेल्या बेमुदत संपा मुळे तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसह, ज्येष्ठ नागरिकांचे, महिलांचे हाल झाले.

राज्य परिवहन महामंडळाच्या भोर आगारातील सर्व कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग घेतल्यामुळे भोर मधील सर्वच एसटी बंद होत्या. एसटी कर्मचारी संपाची पूर्व कल्पना नसल्याने अनेक प्रवासी बस थांब्यावर एसटी गाड्यांची वाट पाहत ताटकळले होते. भोर आगारातील एसटीच्या १६२ फेऱ्या बंद झाल्याने एका दिवसाचे सुमारे तीन लाखांचे उत्पन्न बुडाले असले तरी मात्र तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्या र्थ्यांसह,ज्येष्ठ नागरिकांचे, महिलांचे हाल झाले.

सोमवारी रात्री ग्रामीण भागात मुक्कामाला गेलेल्या एसटीच्या गाड्या मंगळवारी सकाळी भोरला आल्या. परंतु, त्यानंतर सर्व गाड्या भोर आगारात थांबवून कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलन केले. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटीच्या संपाची माहिती नसल्यामुळे त्यांना खासगी गाड्यांसाठी ताटकळत बसावे लागले. तालुक्याच्या अतिदुर्गम भागातील सुमारे ५० किलोमीटर अंतराच्या पुढील प्रवासासाठी खासगी वाहनही मिळत नसल्यामुळे अधिकच त्रास सहन करावा लागला.

भोर तालुक्यातील दुर्गम डोंगरी भागात वाहतुकीचे महत्वाचे साधन एसटी असून ग्रामीण भागातून भोर ला आलेल्या परंतु एसटीची सोय नसल्यामुळे मोफत प्रवास असलेल्या ज्येष्ठांना आणि अर्धे तिकीट असलेल्या महिलांना पुन्हा परत जाण्यासाठी एसटी मिळाली नाही. त्यामुळे त्यांना नाइलाजास्तव खासगी गाड्या व इतर वाहनांमध्ये प्रवास करावा लागल्याने सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सकारा त्मक निर्णय घेऊन तात्काळ तोडगा काढावा अशी मागणी प्रवाशी व नागरिकांकडून केली जात आहे.

**आमच्या विविध मागण्यांसाठी आम्ही संप पुकारलेला आहे; परंतु एसटी कामगारांच्या कृती समितीच्या आदेशानुसार संप मिटल्यावर आम्ही लगेच कामावर हजर होऊन प्रवाशांना सेवा द्यायला सुरुवात करणार आहे.**

**मोहन जेधे,**
**जिल्हाध्यक्ष, एसटी कर्मचारी संघटना**

# त्यापूर्वी लक्षात घेणार निष्ठावंतांचे मतः शरद पवार यांचे स्पष्टीकरण

**कोल्हापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरू असतानाच पक्षप्रमुख शरद पवार यांनी त्याबाबत पक्षाचे धोरण स्पष्ट केले आहे. येईल त्याला सरसकट पक्षात घेतले जाणार नाही. येणारा नेता ज्या भागातील असेल त्या भागातील अडचणीच्या काळात आपल्याबरोबर राहिलेल्या निष्ठावान नेत्या कार्यकर्त्यांचे मत विचारात घेतले जाईल, असे पवार यांनी स्पष्ट केले.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला फारशी चमक दाखवता आली नाही. मात्र, शरद पवार गटाने या निवडणुकीत उल्लेखनीय कामगिरी बजावली. आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीकडून अजित पवार गटाला फार मोठ्या संख्येने जागा मिळण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे अजित पवार गटासह अन्य पक्षातूनही शरद पवार गटात मोठ्या प्रमाणावर इनकमिंग होत आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी त्याबाबतचे धोरण पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे.

कोणत्याही नेत्याला पक्षात प्रवेश देण्यापूर्वी त्याच्या भागातील स्थानिक निष्ठावंत नेते कार्यकर्त्यांचे मत निश्चितपणे विचारात घेतले जाईल. पक्षात येऊ इच्छिणाऱ्या नेत्याच्या सार्वजनिक क्षेत्रातील कामांचा आढावा घेतला जाईल. त्याचप्रमाणे संबंधित नेत्याला प्रवेश दिल्यास पक्षाला त्याचा कितपत उपयोग होऊ शकेल, याची चाचपणी देखील केली जाईल, असे पवार यांनी सांगितले.

कोल्हापूर दौऱ्यावर असलेल्या शरद पवार यांच्या उपस्थितीत कागलचे समरजीत घाटगे यांनी भारतीय जनता पक्षाची कास सोडून शरद पवार गटाची तुतारी हाती घेतली आहे. त्याचप्रमाणे विशेषतः अजित पवार गटातील अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी शरद पवार यांची भेट घेतली असून ते देखील त्यांच्या गोटात सहभागी होण्याची चिन्ह आहेत.

# सावळसिद्ध विकास सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत

## १४ % लाभांश जाहीर, स्थापना दिन साजरा

**सांगली :** सावळज, ता. तासगाव येथील श्री सावळसिद्ध विकास सोसायटी लि. सावळज या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी खेळीमेळीत पार पडली.शतकपूर्तीच्या निमित्ताने संस्थेचा स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सभासदांना १४% लाभांश जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमाला तासगाव कवठेमहांकाळचे भाजप युवा नेते प्रभाकर पाटील तसेच परिसरातील विविध विकास सोसायटी अध्यक्ष व सचिव उपस्थित होते.

सावळसिद्ध विकास सोसायटीच्या स्थापनेस शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. तासगाव तालुक्यातील पहिली विकास सोसायटी असलेली सावळसिद्ध विकास सोसायटीला शंभर वर्षे पूर्ण झाल्याने शताब्दी महोत्सव गेले वर्षभर संस्था साजरी करत आहे. संस्थेतर्फे वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मंगळवारी वार्षिक सर्वसाधारण सभा व स्थापना दिनाचे औचित्य साधून मधुर मिलन मंगल कार्यालय येथे कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी



ज्येष्ठ सभासदांच्या हस्ते केक कापण्यात आला. यावेळी संचालक प्रशांत कुलकर्णी यांनी सभासदांना संबोधित केले. सन २०२३- २४ अहवाल सालात ४८ लाख इतका विक्रमी नफा झाला.यावेळी सभासदांना १४% लाभांश जाहीर करण्यात आला. संस्थेतर्फे आणखी शंभर सभासदांच्या कृषी अभ्यास दौऱ्यासाठी तरतूद केली आहे तसेच नियमित कर्ज भरणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून भेटवस्तूसाठी ही तरतूद केली आहे. संस्थेच्या सिद्धेवाडी रोडवरील अर्ध्या एकर जागेत गोडाऊन बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. सभासदांना स्वनिधीतून खावटी कर्ज आणि प्रिकुलिंग युनिट व कोल्ड स्टोरेज उभारणी बाबत आगामी कार्यकाळात संस्था प्रयत्नशील असल्याचे सांगितले. प्रास्ताविक संचालक संदीप माळी व अहवाल वाचन सचिव निलेश रिसवडकर यांनी केले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष शिवाजी पाटील, उपाध्यक्ष इंदुताई पोळ, पॅनल प्रमुख ऋषिकेश बिरणे, महादेव चिवटे, माजी सरपंच सुनील केडगे, योगेश पाटील, शिदगोंडा पाटील, मनोज पाटील, शामराव भडके,धोंडीराम माळी, सर्व संचालक व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

**सावळसिद्ध विकास सोसायटी तालुक्यात आदर्शवत असून सतत येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीत सुद्धा सभासदांच्या सहकार्याच्या बळावर संस्थेचे कार्य कौतुकास्पद आहे. एकीकडे सहकारावरील विश्वास काही घटनांमुळे उडत असताना संस्थेने शंभर वर्षे पूर्ण करत नावलौकिक कमावलेला आहे. संचालक मंडळांने सभासदांच्या दुरगामी फायद्यासाठी निर्णय घ्यावेत.**

**मा. प्रभाकर पाटील**
**भाजप नेते, तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा**

# सुभाष कुल महाविद्यालय नेपाळ येथे आयोजित करणार आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**दौंड :** केडगाव येथील सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय व त्रिभुवन विश्वविद्यालय काठमांडू नेपाळ , पैंन्जिया जिओग्राफर असोसिएशन व महाराष्ट्र भूगोल परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने मे २०२५ मध्ये त्रिभुवन युनिव्हर्सिटी भूगोल विभाग, काठमांडू नेपाळ येथे दक्षिण आशियाई देशातील पर्यावरणीय समस्या, आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक व संस्कृती विकास ,साधन संपदा विकास ,भाषिक साधर्म्य, आर्थिक विकास, व्यापार विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले जाणार आहे .या चर्चासत्राच्या आयोजनात सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय महत्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात श्रीलंका, नेपाल ,भारत ,बांगलादेश, पाकिस्तान, अमेरिका व विविध देशातील प्राध्यापक ,भूगोल तज्ज्ञ , विद्यार्थी तसेच नागरिक



सहभागी होणार आहेत.यामध्ये विविध विषयांवर शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. याचा उपयोग विकसनशील देशांना विकासाच्या दृष्टिकोनातून होणार आहे . सुभाष बाबुराव कुल शैक्षणिक विकास संकुल समितीचे प्रमुख डॉ. अशोक दिवेकर, पेंन्जिया जॉग्रफर असोसिएशन भारत यांचे सचिव संतोषजी माने, महाराष्ट्र भूगोल परिषदेचे चेअरमन डॉ. प्रवीण सप्तर्षी यांनी नुकतीच त्रिभुवन युनिव्हर्सिटी काठमांडू नेपाळ येथे भेट देऊन विविध विभागाची माहिती घेतली. यावेळी त्रिभुवन विश्वविद्यालयाचे रजिस्टार डॉ. केदार रिजल ,डॉ प्रोफेसर उमेश कुमार मंडल, भूगोल विभाग प्रमुख यांनी भारतीय भूगोलतज्ञांना पशुपतिनाथ मंदिराची प्रतिकृती देऊन सन्मानित करून विशेष आभार मानले. संयुक्तिकरित्या आयोजित केल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात त्रिभुवन विश्वविद्यालय पूर्णपणे सहकार्य करेल याची ग्वाही दिली. व सामंजस्य करारावर, सकारात्मक निर्मितीवर चर्चा केली. भविष्यात त्रिभुवन विश्वविद्यालय व सुभाष बाबुराव कुल महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करारानुसार शैक्षणिक मूल्यांचे आदान-प्रदान केले जाईल.